# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६ ) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

(परीक्षा व मुल्यमापन मंडळ)

**एम.आय.डि.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली – ४४२६०५**

**E-mail:** director.boee@unigug.ac.in

जा.क्र/गोंवीग/पवमुमं/६५३/२०२६ दिनांक: २५/०४/२०२६

**मा. प्राचार्य,**

सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय: उन्हाळी २०२६ परीक्षेपासून उत्तरपत्रिकांचे 'ऑन-स्क्रीन' मूल्यांकन (On-Screen Evaluation) करण्याबाबत आणि परीक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने शैक्षणिक सुधारणांचा भाग म्हणून **उन्हाळी २०२६** च्या परीक्षांपासून सर्व उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन'**ऑन-स्क्रीन**' (**On-Screen Evaluation**) पद्धतीने करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ही प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि जलद करण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध आहे. त्यानुसार, आपल्या महाविद्यालयातील सर्व पात्र परीक्षकांना खालील वेळापत्रकानुसार ऑनलाइन प्रशिक्षण सत्रात सहभागी होण्याचे निर्देश द्यावेत.

**प्रशिक्षण वेळापत्रक:**

| **क्र.** | **मूल्यमापन केंद्र (Valuation Centre)** | **प्रशिक्षणाची तारीख व वेळ** | **ऑनलाइन लिंक** |
|---|---|---|---|
| 1 | **गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली केंद्र** | **दिनांक २७ /०४/२०२६, सकाळी. ११.०० वाजता** | **https://teams.microsoft.com/meet/42903519525880?p=3fTTmxMKcJHplZzCo9** |
| 2 | **सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर** | | |
| 3 | **नेवाजाबाई हितकारणी (N.H.) महाविद्यालय, ब्रह्मपुरी** | | |

**आपणाकडून अपेक्षित कार्यवाही:**

१. आपल्या महाविद्यालयातील सर्व पात्र शिक्षकांचे (मूल्यांकनकर्त्यांचे) अद्ययावत ईमेल आयडी आणि मोबाईल क्रमांक संकलित करून ठेवावेत.

२. संबंधित लिंकवरून सर्व शिक्षकांना प्रशिक्षण सत्रात उपस्थित राहणेस आदेशित करावे.

३. 'ऑन-स्क्रीन' मूल्यांकनामुळे निकाल प्रक्रियेत होणारा फायदा लक्षात घेता यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

**प्रा.धनराज अ.पाटील**

**संचालक (प्र.),**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**महत्त्वाची सूचना:**
ही प्रणाली उन्हाळी २०२६ पासून लागू होत असल्याने सर्व परीक्षकांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करणे हे या प्रशिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. **ऑन-स्क्रीन**' मूल्यमापन चे विडियो आणि माहिती पुस्तिकेची डाउनलोड लिंक विद्यापीठ संकेतस्थळावर आपल्या प्रशिक्षणासाठी उपलब्ध आहे.

**प्रती लिपी**

१.मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक

२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय